# कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचा तुलनात्मक अभ्यास

**डॉ. गजानन मुरलीधर खेकाडे,**
सहाय्यक प्राध्यापक
आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर, जि. धुळे.

**सारांश—**

प्रस्तुत संशोधनात कनिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचा सद्यस्थिती संदर्भातील अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. सहेतूक नमुना निवड पद्धतीने कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता अकरावीच्या कला शाखेतील ६०, विज्ञान शाखेतील ६० व वाणिज्य शाखेतील ६० असे एकूण १८० विद्यार्थ्यांची निवड केली होती. माहितीचे संकलन करण्यासाठी डॉ.व्ही.पी. शर्मा, रायपूर व अनुराधा गुप्ता, रायपूर यांची प्रमाणित शैक्षणिक महत्त्वाकांक्षा शोधिकेचा अवलंब करण्यात आला होता. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन व टी मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणांचा अवलंब करण्यात आला होता. विद्यार्थ्यांची महत्त्वाकांक्षा उच्चस्तरावर असून कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षेत फरक दिसून येत नाही.

**प्रस्तावना—**

शिक्षण घेत असतांना विद्यार्थी हा भांबावलेल्या अवस्थेत असतो. आपल्याला केवळ अभ्यास करुन उत्तीर्ण व्हायचे आहे हा एकच उद्धेश डोळयासमोर ठेवून तो शिकत असतो. त्यावेळेस अपेक्षा हया आई वडिलांच्या अधिक असतात. तो आपला अभ्यास करतो आणि परीक्षा देत या प्रक्रियेतून पुढे जात असतो. अशा वेळेस त्याला समजून घेतले पाहिजे. जीवनाच्या वाटेवर आपली कोणती महत्त्वाकांक्षा आपल्या यशस्वी बनवू शकते याचे चिंतन करण्याची क्षमता आजच्या शिक्षण प्रक्रियेत असलेल्या विद्यार्थ्यांसमोर असली पाहिजे. महत्त्वाकांक्षा हा शब्द मनुष्याला त्याच्या अंतिम ध्येयापर्यंत घेवून जाण्यासाठी उर्जा पुरवित असतो. काही वेळेस हा शब्द मनुष्याला अंतिम क्षणापर्यंत भुलवित ही असतो. म्हणूनच महत्त्वाकांक्षाही नेहमी सकारात्मक स्वरुपाची असणे ही अतिशय महत्त्वाची आहे.

आज प्रत्येक पालक आपल्याला पाल्यास एक महत्त्वाकांक्षा बाळगून उच्च स्तरावरील शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत असतो. परंतु ब—याच वेळेस मुलाच्या महत्त्वाकांक्षा आणि पालकांच्या आपेक्षा यांच्यातील सुत जुळत नाही, परिणामी तो सर्वस्वी परिणाम मुलांना आपल्या भावी आयुष्यात भोगावा लागतो. पालक आणि शिक्षक यांनी मुलांच्या महत्त्वाकांक्षा योग्य वेळीच गवसल्या पाहिजेत. जेणे करुन पुढील आयुष्यात मुलेही आपल्या निश्चित केलेल्या मार्गावरच मार्गक्रमण करीत यश संपादन करु शकतात.

आज आपण पाहतो कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षणाकडे पालक वर्ग अधिकच लक्ष देवून विविध प्रकारच्या शिकवणी, पुस्तके, नोटस् अशा अनेक गोष्टी मुलांसमोर उभी करतात. परंतु मुलांना नेमके काय हवे आहे याच विचार कधीच करीत नाही. या कालावधीत मुलांच्या मनाचा, त्यांच्या महत्त्वाकांक्षेचा विचार जर पालकांनी केला तर ते भविष्यात वेगळया पद्धतीने जगासमोर उभे राहतील. नव्या क्षमता घेवुन प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होवुन त्यास नवीन प्रेरणा देतील. म्हणूनच हा काळी अतिशय महत्त्वाचा असल्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षाकडे अधिक बारकाईने लक्ष देणे गरजेचे आहे. म्हणूनच प्रस्तुत संशोधनात शिरपूर तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.

**समस्या विधान—**

शिरपूर तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता अकरावीच्या कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**उद्दिष्टे**

१. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचा अभ्यास करणे.
२. कनिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**परिकल्पना**

१. कनिष्ठ महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.
२. कनिष्ठ महाविद्यालयातील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.
३. कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.

**संशोधनाची कार्यपद्धती —**

**संशोधन पद्धती—**प्रस्तुत संशोधनात कनिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचा सद्यस्थिती संदर्भात अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला होता. **जनसंख्या—**प्रस्तुत संशोधनात शिरपूर तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता अकरावीच्या कला, विज्ञान वाणिज्य शाखेला प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांची जनसंख्या म्हणून निश्चिती करण्यात आली होती. **न्यादर्श—** प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सहेतूक नमुना निवड पद्धतीने कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता अकरावीच्या कला शाखेतील ६०, विज्ञान शाखेतील ६० व वाणिज्य शाखेतील ६० असे एकूण १८० विद्यार्थ्यांची निवड केली होती. **संशोधनाचे साधन—**प्रस्तुत संशोधनाशी संबंधित माहितीचे संकलन करण्यासाठी डॉ.व्ही.पी.शर्मा, रायपूर व अनुराधा गुप्ता, रायपूर यांची प्रमाणित शैक्षणिक महत्त्वाकांक्षा शोधिकेचा अवलंब करण्यात आला होता. यात एकूण १० विधाने होती. विश्वसनीयता गुणांक .७९८ इतका निश्चित करण्यात आला होता. संख्याशास्त्रीय परिमाणे — संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन व टी मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणांचा अवलंब करण्यात आला होता.


**संकलित माहितीचे विश्लेषण अर्थनिर्वचन —**

प्रस्तुत संशोधनात कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षा मापन करण्यासाठी प्रमाणित शोधिका विद्यार्थ्यांना देण्यात आली होती. शोधिकेला विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादाचे पुढीलप्रमाणे विश्लेषण करण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक १.**

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक महत्त्वाकांक्षोचे वर्गीकरण

| स्तर | प्रमाण | विद्यार्थ्यांचा प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| **उच्च शैक्षणिक महत्त्वाकांक्षा** | ५३—८० | ९२ | ५१ |
| **मध्यम शैक्षणिक महत्त्वाकांक्षा** | २७—५२ | ६३ | ३५ |
| **निम्न शैक्षणिक महत्त्वाकांक्षा** | ०—२९ | २५ | १४ |
| | | १८० | १०० |





**निरीक्षण:**

तक्ता क्रमांक १ वरुन.. कनिष्ठ महाविद्यालयातील ५१ टक्के विद्यार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षा उच्च स्तरावर दिसून येते. कनिष्ठ महाविद्यालयातील ३५ टक्के विद्यार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षा मध्यम स्तरावर दिसून येते. कनिष्ठ महाविद्यालयातील १४ टक्के विद्यार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षा उच्च स्तरावर दिसून येते. निष्कर्ष: कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षा उच्चस्तरावर दिसून येते.

**परिकल्पना परीक्षण—**

प्रस्तुत संशोधनाच्या उदिदष्ट क्रमांक २ नूसार खालीलप्रमाणे परिकल्पना परीक्षण करण्यात आले. विद्यार्थीनी दिलेल्या प्रतिसादाचे मध्यमान व

प्रमाणविचलन काढण्यात आले व त्यावरुन खालीलप्रमाणे परिकल्पना परीक्षण करण्यात आले.




**१. कनिष्ठ महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.**

| शाखा | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | टेबल टी मूल्य | प्राप्त टी मूल्य | निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| **कला** | ६० | ४३.९३ | ९.१९ | २.०० | ०.१८ | स्वीकार |
| **विज्ञान** | ६० | ४४.२४ | ९.१५ | | | |

**निरीक्षण व अर्थनिर्वचन: स्वाधीनता मात्रा** (df) ११८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर प्राप्त टी मूल्य ०.१८ हे टेबल टी मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरुन असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.

**निष्कर्ष:**

कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षा सारखीच दिसून येते.

**२. कनिष्ठ महाविद्यालयातील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.**

| शाखा | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | टेबल टी मूल्य | प्राप्त टी मूल्य | निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| कला | ६० | ४३.९३ | ९.१९ | २.०० | ०.४४ | स्वीकार |
| वाणिज्य | ६० | ४३.१९ | ८.९१ | | | |

**निरीक्षण व अर्थनिर्वचन: स्वाधीनता मात्रा** (df) ११८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर प्राप्त टी मूल्य ०.४४ हे टेबल टी मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरुन असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.

**निष्कर्ष:**

कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षा सारखीच दिसून येते.

**३. कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.**

| शाखा | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | टेबल टी मूल्य | प्राप्त टी मूल्य | निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| **विज्ञान** | ६० | ४४.२४ | ९.१५ | २.०० | ०.६३ | स्वीकार |
| **वणिज्य** | ६० | ४३.१९ | ८.९१ | | | |

**निरीक्षण व अर्थनिर्वचन: स्वाधीनता मात्रा** (df) ११८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर प्राप्त टी मूल्य ०.६३ हे टेबल टी मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरुन असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.

**निष्कर्ष:**

विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षा सारखीच दिसून येते.

**निष्कर्ष**

१. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षा उच्चस्तरावर दिसून येते.
२. कनिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षेत फरक नाही.

**चर्चा—**

प्रस्तुत संशोधनात कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचा अभ्यास करण्यात आला होता. निष्कर्षाचा विचार केल्यास असे दिसून येते की, विद्यार्थ्यांची महत्त्वाकांक्षा उच्चस्तरावर असून कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षेत फरक दिसून येत नाही. या शैक्षणिक महत्त्वाकांक्षा पालकांनी व शिक्षकांनी हेरल्या पाहिजेत. कनिष्ठ महाविद्यालय हा शिक्षणक्रम विद्यार्थ्यांना भविष्यातील त्यांची नेमकी भूमिका काय राहणार आहे यासाठी उपयोगी असतो. या काळात शिक्षकांनी विद्यार्थ्यांसमोर नवनीवन गोष्टी, व्यावसायिक क्षेत्रातील अद्ययावत घडामोडीशी मांडल्या पाहिजेत. पालकांनीही आपल्या पाल्यांसमोर त्यांची क्षमता ओळखण्यासाठी, निर्णय घेण्यासाठी त्यांना सतत प्रेरणा दिली पाहिजे.

**संदर्भग्रंथसूची**

1. Best, J.W. and Khan, K.M. (2002). *Research in Education.* New Delhi: Practice Hall of India.
2. Cattell, R. B. (2008). *Psychological Testing.* New Delhi: Srishti Book Distributors.
3. Kerlinger, F. W. (2000). *Foundation Behavioral Research.* New York: Rinehart and Winston Inc.
4. Kothari, C. R. (1990). *Research Methodology, Methods and Techniques.* New Delhi: Wiley Eastern Limited.
5. पंडित, ब. बि. (२००५). *शिक्षणातील संशोधन.* पुणे: नित्यनूतन प्रकाशन.
6. भारंबे, इंदमुती. (२०१४). *शैक्षणिक संख्याशास्त्र.* जळगांव: प्रशांत पब्लिकेशन्स.
7. भिंताडे, वि. रा. (१९८९). शैक्षणिक संशोधन पद्धती. पुणे: नूतन प्रकाशन.
8. मगरे, सुनिता. (२०११). (संपा.) *शिक्षणातील संशोधन पद्धती.* एम.ए. भाग १, शिक्षणशास्त्र, अभ्यासपत्रिका ३. मुंबई विद्यापीठ, मुंबई.